# भूमिका

# भूमिका

## अभ्यास-विषयाचे औचित्य -

मानवी स्वातंत्र्य आणि समता यांचा पुरस्कार करणारे म• जोतीराव फुले, हे महाराष्ट्रातील पहिले क्रियाशील विचारवंत. प्रस्थापित वर्णव्यवस्था आणि विषमता यांच्याविरुद्ध बंड पुकारून नव्या मानवतावादी आणि समतावादी समाजव्यवस्थेची मांडणी हे त्यांच्या कार्याचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य होय• आपला विचार जनमानसात रुजविण्यासाठी म• फुले यांनी लेखन केले• वैचारिक, नाटयात्मक आणि काव्यस्वरूप असे त्याचे वैविध्यपूर्ण स्वरूप आहे• सत्याचा शोध घेणाऱ्या या प्रभावी लेखनाला फार मोठे असे सामाजिक आणि वाङ्मयाचे मूल्य असल्याने या ग्रंथसंपदेचा संशोधनात्मक अभ्यास ही एक मूलभूत गरज ठरते•

मानवी हक्कांच्या जाणिवेने प्रेरित होऊन पारंपारिकता आणि प्रस्थापित यांच्या विरुद्ध महात्मा फुले यांनी बंड केले• खेड्यांचा श्रीमंत देश असणाऱ्या हिंदुस्थानात या काळात शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत शोचनीय होती• उपेक्षा आणि शोषण या दोन्हींचा हा वर्ग बळी झाला होता• ज्या मानसिक गुलामगिरीत तो अडकला होता तिचे कारण केवळ 'अविद्या' हे होते आणि शिक्षण हाच त्यावर एकमेव उपाय होता•

सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टया उपेक्षित राहिलेल्या या शेतकऱ्यांच्या वर्गाची कैफियत महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा

असूड' मधून मांडली आहे. शीर्षकातील 'असूड'चा उल्लेख फुले यांची भूमिका स्पष्ट करणारा आहे. शेतकरी वर्गाची स्थिती तीवरील उपाय आणि उपायासंबंधी तपशीलवार विवेचन या ग्रंथात आले आहे. शेतक-याची कैफियत मांडणारा आणि त्यांच्या विकासाची दिशा दाखविणारा मराठीतील हा पहिलाच ग्रंथ होय.

१८८१ च्या सुमारास भारतीय जीवनात शेतक-यांच्या समस्या बिकट आणि तीव्र बनत होत्या सुमारास लोकहितवादींसारख्या (ग्रामरचना / १८८१) आणि यापूर्वी, बाळशास्त्री जांभेकरासारख्या (शेतकरी लोकास सरकारचे उत्तेजन/ दर्पण, १८३२) विचारवंतांनी या प्रश्नाची चर्चा आपल्या लेखनातून केलेली असली, तरी तिला स्वानुभवाची तीव्रता प्राप्त झाली, ती म. फुले यांच्या लेखनातूनच. कृषिप्रधान समाजव्यवस्थेतील प्रश्न, त्यांच्या व्यथा-वेदना, त्यांच्या वर्गातीलच कुणी तरी मांडणे आवश्यक होते. सस्वेदन आणि स्वानुभूती यांच्या मिती हे 'शेतक-याचा असूड' चे वैशिष्टय म्हणायला हवे. अज्ञानी, अशिक्षित, प्रस्थापित व्यवस्थेने दबलेल्या शेतक-याच्या मनातील प्रक्षुब्ध हुंकार जसा म. फुले यांनी येथे व्यक्त केला आहे, तशी शेतक-यांच्या दुःखदारिद्र्याची मीमांसा करून त्यांच्या विकास-प्रगतीची दिशाही दाखविली आहे. त्यामुळे एकोणिसाव्या शतकातील वाङ्मयनिर्मितीत हा ग्रंथ उठून दिसतो. त्याची निर्मिती एकोणिसाव्या शतकातील असली, तरी आजही पूर्तेपणाने न सुटलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे सामर्थ्य हे या ग्रंथाचे अनन्यसाधारण वैशिष्टय म्हटले पाहिजे. म्हणून अनेक अंगानी संपन्न असणा-या या ग्रंथाचा लघुप्रबंधाच्या रूपाने सामाजिक आणि वाङ्मयीन दृष्टिकोणातून अभ्यास ही एक महत्त्वाची गरज ठरते.

## पूर्वाभ्यासाचे स्वरूप -

म.फुले यांच्या वाङ्‌मयाचा अभ्यास आजवर अनेक विचारवंतांनी आणि संशोधकांनी केला आहे. पंढरीनाथ पाटील, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रभाकर वैद्य, डॉ.स.गं.मालशे, धनंजय कीर, प्रा.गं.बा.सरदार आदी मंडळींनी चरित्रलेखन, ग्रंथसंपादन, आणि विचारांचा परामर्श अशा स्वरूपाचा सखोल अभ्यास मांडला आहे. के.पी.बी.साळुंखे यांनी संपादित केलेल्या 'महात्मा फुले गौरवग्रंथ' १९८२ या ग्रंथानेही या अभ्यासात मोठीच भर घातली आहे. व्यक्ती वाङ्‌मय आणि विचार अशा मुद्यांच्या अनुषंगाने पीएच्.डी. पदवीसाठी विद्यापीठीय पातळीवरील म.फुले यांच्या विषयी संशोधन झाले आहे. या शिवाय अनेक विचारवंतांनी या विषयावरील अभ्यास ग्रंथरूपाने मांडला आहे. स्थळभयास्तव त्यातील काहीचाच उल्लेख करणे येथे शक्य आहे.

वरील अभ्यास लक्षात घेऊनही म. फुले यांच्या प्रत्येक ग्रंथावर स्वतंत्रपणे सामाजिक आणि वाङ्‌मयीन संदर्भात अभ्यास होण्याची आवश्यकता राहतेच. अशा अभ्यासातून त्यांच्या लेखनामागील सामाजिक परिस्थिती आणि प्रेरणा, त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि विचारसरणी, तिची अभिव्यक्ती आणि तिचे वाङ्‌मयीन विशेष यांचा तपशीलाने शोध घेतला गेल्यास म.फुले यांच्या विचार-लेखनाचे आकलन अधिक सर्वांगीण होण्यास मदत होईल. या भूमिकेनेच 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाचा अभ्यास करावयाचे येथे ठरविले आहे.

## प्रस्तुत अभ्यासाची दिशा -

प्रस्तुत अभ्यासाचे स्वरूप पुढीलप्रमाणे ठेविले आहे. पार्श्वभूमी-

दाखल एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि वाङ्•मयनिर्मिती-च्या प्रेरणांचे स्वरूप विशद केले असून, म•फुले यांच्या विचार-कार्याचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील विचारवंताचा परामर्श जाणीवपूर्वक घेतला आहे•

तिस-या प्रकरणात म•फुले यांच्या लेखनविषयक भूमिकेचीओळख करून दिली असून त्यांच्या वाङ्•मय संपदेचे स्वरूपही धावतेपणाने स्पष्ट केले आहे• 'शेतक-याचा असूड' मधील समाजदर्शन आणि म•फुले यांचे समाजचिंतन याविषयीचे तपशीलवार विवेचन चौथ्या प्रकरणात केले असून पाचव्या प्रकरणात 'शेतक-याचा असूड'ःवाङ्•मयीन विशेषांचा अभ्यास मांडला आहे•